# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.मुमाआ/नों.क्र.२२०८०८/२२/अ.क्र.४१८४/२५/०१

**Mr. Kedar Sayyed**
C-53/147, Iraniwadi, Kailash Puri Road,
Opp. Dargah, Squatters Colony,
Malad (E), Mumbai-400097

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) पी/दक्षिण**
बृहन्मुंबई महानगरपालिका, उप प्रमुख अभियंता (रस्ते) प.उ. यांचे कार्यालय,
पी/दक्षिण विभाग इमारत, दुसरा मजला, सीटीएस क्र. ७४६, सिटी सेंटर मॉल समोर,
व्हिलेज पहाडी, एस.व्ही.रोड, गोरेगाव (प), मुंबई ४०० १०४.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते)**
**पश्चिम उपनगरे, परि-४**
बृहन्मुंबई महानगरपालिका, उप प्रमुख अभियंता (रस्ते) प.उ. यांचे कार्यालय,
पी/दक्षिण विभाग इमारत, दुसरा मजला, सीटीएस क्र. ७४६, सिटी सेंटर मॉल समोर,
व्हिलेज पहाडी, एस.व्ही.रोड, गोरेगाव (प), मुंबई ४०० १०४.

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०७.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.०७.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) पी/दक्षिण व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) परि-४ यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सूचना न देता अनुपस्थित आहेत.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्री. केदार सय्यद यांनी दाखल केलेल्या दि.०१.०९.२०२१ रोजीच्या जोडपत्रानुसार कार्यादेश क्र.W-३०५ याबाबतीत अपिलार्थी यांनी १२ मुद्द्यांची माहिती मागितली असून, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) पी/दक्षिण यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती प्राप्त करून घेण्याबाबत प्रतिसाद दिला असून रुपये १०४४/- शुल्क भरल्यानंतर माहिती पुरवण्यात येईल, असे नमूद केलेले आहे. तथापि पुरवलेली माहिती ही दिशाभूल करणारी व चुकीची असल्याचा आक्षेप नोंदवित अपिलार्थी यांनी प्रथम अपील

अर्ज दाखल केला असून त्यावर दि.०५.०१.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली व दि.२२.०१.२०२२ रोजी आदेश निर्गमित करण्यात आला. अपिलार्थी यांनी मागितलेलीच माहिती त्यांना पुरवण्यात आली असल्याचा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) पी/दक्षिण यांचे प्रतिपालन लक्षात घेत तसेच अर्जदार यांना या व्यतिरिक्त अजून माहिती हवी असल्यास स्वतंत्र अर्ज दाखल करण्याची सूचनासह प्रस्तुत अपील अर्ज निकाली काढण्यात आला आहे, असे आढळून येते. अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जात दिलेला प्रतिसाद हा दिशाभूल करणारा असून अर्धवट अपूर्ण माहिती पुरविण्यात आली असल्याचा आक्षेप नोंदविलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांना याआधीच सशुल्क माहिती पुरवण्याबाबत आदेश पारित करण्यात आला असून, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) पी/दक्षिण यांनी एकूण ५२२ पृष्ठांची माहिती पुरविणे अपेक्षित होते. यातील ५२२ पृष्ठांची माहिती पुरवली असल्यास त्यासंबंधीचा अहवाल आयोगासमोर सादर करावा, त्याची एक प्रत अपिलार्थीस प्रदान करावी. अपिलार्थी यांच्या द्वितीय अपील अर्जात केवळ ३ कागदपत्रे प्राप्त झाली असल्याचा तीन रजिस्टर प्राप्त झाली असून लेबल बुक M-40 व VATTA REGISTER प्राप्त झाली असून उर्वरित कागदपत्रे अप्राप्त असल्याचे नमूद केलेले आहे. ही वस्तुस्थिती असल्यास उर्वरित माहिती अपिलार्थी यांना तात्काळ प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २४.०७.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission Maharashtra